महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पूरक-१०२५/ प्र.क्र.७०८/पोल-७, दि. २३/०२/२०२६.

**विषय** :- “Extended Special Infrastructure Scheme (SIS), including construction of Fortified Police Stations in LWE affected States” या योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर झालेल्या “Fortified Police Stations” यांचे बांधकाम करणे या योजनेसाठी निधी वितरण करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पूरक-१०२५/ प्र.क्र.७०८/पोल-७, दि. २३/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२२३१४४७४१९६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 25-02-2026 17:43:57

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया.
कार्यासन अधिकारी, का क्र.२१-अ.

प्रत,
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधीक्षक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. पूरक-१०२५/प्र.क्र.७०८/पोल-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३ फेब्रुवारी, २०२६.

**विषय :-** "Extended Special Infrastructure Scheme (SIS), including construction of Fortified Police Stations in LWE affected States" या योजनेखाली महाराष्ट्र राज्यासाठी मंजूर झालेल्या "Fortified Police Stations" यांचे बांधकाम करणे या योजनेसाठी निधी वितरण करण्याबाबत.

**संदर्भ :-**
१. भारत सरकार, गृह मंत्रालय, फा .क्र .१८०१५/१५/२०२२-LWEO-II, दिनांक ३०.०८.२०२२, ७.१०.२०२२, २१.०३.२०२३ and ०६.०२.२०२४.
२. शासन निर्णय क्र.बांधका-०७२४/प्र.क्र.१८१/ पोल-७, दि.१४.१०.२०२४.
३. शासन निर्णय एसआयएस-११२२/प्र.क्र.४००/पोल-७, दि.०२.०५.२०२३, दि.१६.११.२०२३ व शुध्दिपत्रक दि.११.०१.२०२४, दि.१४.०२.२०२४, दि.२४.१२.२०२४, दि.२०.०३.२०२५
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं /२१-अ/१९५/SIS/१०९/२०२२, दि. ३०.१०.२०२५
५. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांचे पत्र क्र. गपग/डी-८/हिवाळी अधिवेशन/विविपासुयो अनुदान मागणी/२०२५-१५१७ गडचिरोली परिक्षेत्र, दि.२९.१०.२०२५.

**शासन निर्णय :-**

भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या "Extended Special Infrastructure Scheme (SIS), या योजनेखाली, दिनांक २५.०१.२०२३ रोजी झालेल्या प्रोजेक्ट क्लीअरन्स कमिटीच्या बैठकीमध्ये केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने सुधारीत आराखडा महाराष्ट्र राज्यासाठी "१६ Fortified Police Stations, SIB/SF and District Police Works" या कामांसाठी उक्त संदर्भ क्र. १ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आराखड्यास मंजूरी दिली आहे.

| अ.क्र. | तपशिल | मंजूर रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| १. | नक्षलग्रस्त भागातील १६ पोलीस ठाण्याचे बळकटीकरण (रु.२.५ कोटी प्रति पोलीस ठाणेच्या मर्यादेत.) | ४०,००,००,०००/- |
| २. | SIB/STF/SF कामांसाठी | १५,६३,९०,०००/- |
| ३. | जिल्हा पोलीस कामांसाठी | ६,९१,५०,०००/- |
| | एकूण | ६२,५५,४०,०००/- |

२. विधीमंडळाच्या डिसेंबर-२०२५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये, पुरक मागणीद्वारे, विस्तारीत विशेष पायाभूत सुविधा (Extended Special Infrastructure Scheme) योजने अंतर्गत रु.२३,५२,१९,०००/- (अक्षरी रूपये तेवीस कोटी बावन्न लाख एकोण्णवीस हजार फक्त) एवढे पूरक अनुदान मंजुर करण्याची विनंती पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांनी केली आहे.

३. त्यानुसार पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांच्या प्रस्तावानूसार रु.२३,५२,१९,०००/- (अक्षरी रूपये तेवीस कोटी बावन्न लाख एकोण्णवीस हजार फक्त) एवढ्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर केला होता.

४. वित्त विभागाने पुरवणी मागणीचा प्रस्ताव व्यय अग्रक्रम समितीने मंजूर केला असल्याचे कळविले असून विहीत लेखाशिर्षाखाली मंजूर पुरवणी मागणीचा निधी १०० टक्के प्रमाणात बिडीएस प्रणालीवर वितरीत केला आहे.

५. वित्त विभागाने वितरीत केल्याप्रमाणे रकमेपैकी पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांनी मागणी केल्यानुसार केंद्र हिश्याची (६० टक्के) रक्कम रु.१४,११,३१,४००/- (रुपये चौदा कोटी एकरा लाख एकत्तीस हजार चारशे फक्त) व राज्य हिश्याची (४० टक्के) रु.९,४०,८७,६००/- (रुपये नऊ कोटी चाळीस लाख सत्तांऐशी हजार सहाशे फक्त) इतकी रक्कम पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली, यांना पीएफएमएस प्रणालीद्वारे वितरण करण्यास याद्वारे, पुढील अटींवर, सशर्त मंजुरी देण्यात येत आहे:-

(१) भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या "Extended Special Infrastructure Scheme (SIS), या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुपालन करण्यात यावे.

(२) संदर्भीय क्र. १ वरील भारत सरकार, गृह मंत्रालय, क्र. १८०१५/१५/२०२२-LWEO-II, दि. २१.०३.२०२३ व ०६.०२.२०२४ यामधील शर्तीचे अनुपालन करण्यात यावे.

(३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आली आहेत.

६. उक्त केंद्र हिश्याचे रु.१४,११,३१,४००/- (रुपये चौदा कोटी एकरा लाख एकत्तीस हजार चारशे फक्त) इतकी रक्कम "गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७, राज्य पोलीस (००) (००) (०३) नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधणे (६० टक्के केंद्र हिस्सा) (अनिवार्य) (४०५५०२०५), ५३, मोठी बांधकामे”, या लेखाशीर्षाखाली आणि राज्य हिश्याचे रु.९,४०,८७,६००/- (रुपये नऊ कोटी चाळीस लाख सत्तांऐशी हजार सहाशे फक्त) इतकी रक्कम "गृह विभाग मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७, राज्य पोलीस (००) (००) (०४) नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधणे (४० टक्के राज्य हिस्सा) (अनिवार्य) (४०५५०२१४) ५३-मोठी बांधकामे" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून, चालू वित्तीय वर्षाच्या (सन २०२५-२६) अर्थसंकल्पीत अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर निधी "विशेष पायाभूत सुविधा" या योजनेच्या Single Nodal Agency (SNA) खात्यामध्ये जमा करण्यासाठी याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. "विशेष पायाभूत सुविधा" या योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

**खात्याचे नाव** - Special Infrastructure Scheme (SIS) :-
स्टेट बँक ऑफ इंडिया, मंत्रालय शाखा,
IFSC Code :- SBIN००६१५२४
बँक खाते क्रमांक :- ४१११९४५०८६०.

८. सदर रक्कम आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून अवर सचिव / कक्ष अधिकारी, (रोख शाखा), गृह विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून उप/सह सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

९. हा शासन परीपत्रक, वित्त विभाग, अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. २९.०१.२०२६ निर्गमित करण्यात येत आहे.

१०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharahstra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०२२३१४४७४१९६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA
MOTIRAM HOLKAR

Digitally signed by RAJENDRA MOTIRAM HOLKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=ac1bf43d6978ca6d925e9240f8c09bf2f3128ad5d62a0dd7d57d2b72c9ea41f4, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=48F41D082A9DD86B54CCCF5B4C6A83A6132C3F6F06A9940BD960612800458BA7, cn=RAJENDRA MOTIRAM HOLKAR
Date: 2026.02.23 14:49:16 +05'30'

**( राजेंद्र होळकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.
२. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली, मुक्काम-नागपूर
३. पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/ गडचिरोली / गोंदिया.
८. अवर सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी (व्यय-७/अर्थ-११/अर्थोपाय), वित्त विभाग.
११. निवड फाईल (पोल-७).